| | |
|---|---|
| <u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. – ४</u> | <u>नि.फौ.ख.क्र. २३/२०११</u> |
| | **सरकार विरुध्द सुधीर** |
| **मी शपथपूर्वक खरे सांगतो की** | **निशाणी – २४** |

**माझे नांव** **– कल्पना अरूण डोंगरे**
**वय** **– अंदाजे ४५ वर्ष, व्यवसाय – हातमजूर**
**राहणार** **– कन्हान, जि. नागपूर**

**सरतपास सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती वर्मा यांच्या कडून –**

चंद्रकला पाटील व अनिल पाटील यांना मी ओळखते. चंद्रकला माझी ननंद आहे व अनिल माझा भाचा आहे. दि.११.०२.२०११ रोजी मी माझी ननंद चंद्रकला यांच्या घरी होती. त्यादिवशी रात्री ९ वाजता न्यायालयात हजर असलेले दोन आरोपी शिव्या देत माझ्या ननंदेच्या दारात आले त्यामुळे आम्ही सर्वजण आम्ही घराच्या बाहेर आलो. त्यावेळी माझ्या भाच्याने आरोपींना माझ्या घरी पाहूणे आले आहेत शिव्या नको देउ असे सांगितले. त्यावेळी त्या दोघापैकी एकाने अनिलचे हात धरले व दुस–याने पोटात चाकू मारला. त्यावेळी चंद्रकला मध्ये गेली असता तिलाही आरोपीने चाकू मारला तो चाकू तिला हाताला लागला. त्यानंतर आम्ही माझ्या भाच्याला घरात आणले व त्यावेळी आरोपी निघून गेले. आमच्याकडे दवाखान्यात जाण्यासाठी त्यादिवशी साधन नसल्याने दवाखान्यात गेलो नाही. दुस–या दिवशी सकाळी ८ वाजता दवाखान्यात गेलो. आरोंपीपैकी सुधीर याने माझ्या भाच्याचा हात पकडला होता व संजयने चाकू मारला होता. पोलीसांनी माझा जबाब नोंदविला होता.
**सरतपास संपला**.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. रामटेके यांच्या कडून –**

मी पोलीसांना जबाब देताना आम्ही सर्व जण घराच्या बाहेर आलो असे सांगितले होते. माझ्या बयानात आम्ही सर्वजण आलो असे का नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की जखमी माझे नातेवाईक असल्याने त्यांच्या सांगण्यावरून मी खोटी साक्ष देत आहे. त्या ठिकाणी गावातील काही लोक हजर होते. हे म्हणणे खरे नाही की सरकारी वकिलांनी मला समजून

सांगितल्यानी मी तसा जबाब देत आहे. हे म्हणणे खरे नाही की मला घटनेबद्दल काहीही माहित नसताना मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला**.

**फेरतपासणी नाही**.

वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2024.12.04 17:56:01 +0530

कामठी
दिनांक ०२/१२/२०२४

( मोहन रा. कामत )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र.१, कामठी